जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६७३ दिनांक -०७/०९/२०२३**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे शहर

## सराईत वाहन चोराकडुन ५ दुचाकी वाहने जप्त करुन वाहन चोरीचे गुन्हे केले उघडकीस

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन हद्दीत वाहन चोरीचे गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार हे पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असताना पोलीस अंमलदार धनाजी धोत्रे, हर्षल शिंदे, सचिन गाडे, यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की,रेकॉर्डवरील वाहन चोर **कुणाल सुरेश बधे, वय २९ वर्षे, धंदा वायरमन, रा. मु.पो रांजणे, ता.वेल्हा, जि.पुणे** हा अमृत खान, लिपाणे वस्ती येथे चोरीची दुचाकी गाडी घेवुन थांबला आहे अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने तपास पथकाचे अधिकारी व अंमलदारांनी अमृत खान लिपाणे वस्ती गेले असता तेथे नमुद आरोपी हा त्याचे ताब्यात दुचाकी गाडी हीच्यासह मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन तपास करता त्याने सदरची गाडी चोरी केल्याची कबुली दिली असता त्या गाडीबाबत **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ५६५/२०२३, भादंवि कलम ३७९** या गुन्हयातील चोरीस गेले असल्याची निष्पन्न झाले असुन त्याचे ताब्यातील दुचाकी गाडी जप्त करुन त्यास नमुद गुन्ह्यात अटक केली आहे.

आरोपी कुणाल सुरेश बधे, वय २९ वर्षे, धंदा वायरमन,रा.मु.पो रांजणे,ता.वेल्हा,जि.पुणे याचेकडे अटके दरम्यान तपास केला असता त्याचेकडुन एकुण ५ दुचाकी वाहने जप्त करण्यात आली असुन आरोपीताकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

**१. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुरंनं ५६५/२०२३ भादंवि कलम ३७९ प्रमाणे**
**२. कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि ६४३/२०२३ भादंवि कलम ३७९ प्रमाणे**
**३. कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि ३५०/२०२३ भादंवि कलम ३७९ प्रमाणे**

**वरील प्रमाणे आरोपीताकडुन एकुण ३,००,०००/- रुपयांची ५ दुचाकी वाहने जप्त करुन ३ दुचाकी वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.**

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्री.नारायण शिरगावकर, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक(गुन्हे) विजय पुराणिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक गिरीश दिघावकर,अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार धनाजी धोत्रे,सचिन गाडे,हर्षल शिंदे,सचिन सरपाले,चेतन गोरे,शैलेश साठे,महेश बारावकर,निलेश ढमढेरे,मंगेश पवार,अवधतु जमदाडे,अभिजीत जाधव,निलेश खैरमोडे,आशिष गायकवाड,अभिनय चौधरी,राहुल तांबे,विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.



पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे
दुरध्वनी क्रमांक: ०२०-२४३६५१००
महाराष्ट्र पोलीस
पुणे पोलीस